‘दारिद्र्य रेषेखालील बंजारा कुटुंबांच्या हंगामी स्थलांतरामुळे त्यांच्या पाल्यांच्या प्राथमिक शिक्षणावर होणारा परिणाम – एक अभ्यास’.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड – ४३१६०६, महाराष्ट्र राज्य, भारत

आंतरविद्याशाखेतील शिक्षणशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (Ph.D.)
पदवीसाठी सादर शोधप्रबंधाची रूपरेषा

संशोधक

धोंडगे माधव पांडुरंग

(M.A.Edu.B.Ed.,NET,SET)

मार्गदर्शक

डॉ.माने मारुती शिवराम

(M.A.(Mar.His.Eco.) M.Ed.,DSM,Ph.D.)

प्राचार्य, एज्युकेशन सोसायटी नायगाव (बा.) संचालित
अध्यापक महाविद्यालय, नायगाव (बा.)

मार्च – २०२३

-: अनुक्रमणिका :-

अनु. क्र.	तपशील व मुद्दे	पृष्ठ क्रमांक
१	प्रास्ताविक	१
२	संशोधनाची गरज	३
३	संशोधनाचे महत्त्व	४
४	संशोधनाचे समस्या विधान	५
५	विधानातील शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या	५
६	संशोधनाची उद्दिष्टे	७
७	संशोधनाची गृहितके	७
८	संशोधनाची परिकल्पना	८
९	संशोधनाची व्याप्ती	९
१०	संशोधनाची मर्यादा	९
११	संशोधन कार्यपद्धती	१०
१२	संशोधन साधने व तंत्रे	१०
१३	संशोधन जनसंख्या	१०
१४	संशोधन नमुना निवड पद्धती	११
१५	संशोधनाची सांख्यिकीय परिमाणे	११
१६	संशोधनाचे प्रकरणीकरण	११
१७	संशोधन कार्यवाहीचे टप्पे	१२
१८	वेळापत्रक	१३
१९	अंदाजपत्रक	१४
२०	संदर्भ ग्रंथ / सूची	१४

१. प्रास्ताविक :-

भारतभूमीला शिक्षणाचा समृध्द वारसा लाभलेला आहे. प्राचीन भारतातही तत्कालीन जगभर नावारूपास असलेली नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला सारखी विश्वविद्यालये आजही इथल्या जागतिक मार्गदर्शकाच्या भूमिकेची साक्ष देत इतिहासात नोंदवून आहेत. परंतु शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण ही अत्यावश्यक बाब मात्र राष्ट्राची गरज म्हणून कुठेतरी अपूर्णच होती.

स्वातंत्र्योत्तर भारतात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हावे असा विचार मात्र पुढे पुढे येत राहिला, आणि त्याला एक अत्यावश्यक राष्ट्रीय गरज म्हणून पाहिले जाऊ लागले. ८६ व्या घटनादुरुस्तीनुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व मुला मुलींना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असे मान्य केले गेले. आदिवासी, दुर्गम व डोंगराळ भागासह सर्वच ठिकाणी १ किलोमीटर परिसरात व १०० लोकसंख्येसाठी प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने 'वस्ती तेथे शाळा' हे ब्रीद घेऊन वस्ती शाळा इ.स.२००० पासून सुरू करण्यात आल्या. जिल्हा प्राथमिक शिक्षण प्रकल्प (डी. पी. ई. पी.), प्राथमिक शिक्षण समृध्दी कार्यक्रम (पीप) व आमची शाळा इ. प्रकल्पांतर्गत संबंधीत जिल्ह्यामधून संबंधीत प्रकल्पांना मंजुरी असलेल्या निधीतून वस्तीशाळा सुरू करण्यात आल्या.

तांडा वस्तींवर राहणारा बंजारा समाज एक समृध्द वारसा लाभलेला, सांस्कृतिक परंपरा असलेला भारतीय समाज. भारतीय विविधतेत एक स्वतंत्र सांस्कृतिक अस्तित्व जोपासणारा समाज म्हणून बंजारा समाजाकडे पाहिले जाते. काटक, लढवय्या, धाडसी व निसर्गप्रेमी अशी त्यांची खास ओळख सांगता येते. बंजारांचे मूळ स्थान राजपुताना, मारवाड मानले जाते.

देशातील विविध राज्यांमध्ये बंजारा समाजाचे अस्तित्व आहे. सर्वांची बोलीभाषा, पेहराव एकच आहे. परंतु, काही राज्यांत बंजारा समाज अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट आहे, तर काही ठिकाणी ओबीसी प्रवर्गात समाविष्ट आहे. महाराष्ट्र राज्यात व्ही. जे. प्रवर्गात बंजारा समाजाचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व

विशेष सहाय्य विभागाकडे विमुक्त जाती - अ (V.J.) अंतर्गत अनुक्रमांक ७ वर नोंदणीकृत असलेल्या बंजारा समाजातील १६ तत्सम जातींची नोंद ७ अ ते ७ स पर्यंत आहे.

गोर बंजारा समाजासाठी 'गोरमाटी' असाही एक शब्दप्रयोग केला जातो. 'मातीशी जुळलेला माणूस', 'मातीशी नातं ठेवणारा माणूस' म्हणजे गोरमाटी. नेतृत्व करणारा समाज, निडरपणे लढणारा यावरून बंजारा समाजाला 'नायक' असे म्हणतात. तसेच तांडा वसाहतीच्या प्रमुखांना सुद्धा 'नायक किंवा नाईक' असे म्हटले जाते. आजमितीला बंजारा समाज हा भारतातील जवळ जवळ सर्वच राज्यांमध्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये कमी-अधिक प्रमाणात वास्तव्यास असल्याचे पहावयास मिळते.

गोर बंजारा वस्तीला तांडा म्हणतात. तांडयाच्या प्रमुखाला नाईक किंवा नायक असे म्हणतात. 'तांडा' मध्ये प्राचीन काळापासून आजही 'सेनं सायी वेस' ही वैश्विक कल्याणासाठी सामुदायिक प्रार्थना केली जाते. थोर समाजसुधारक महानायक वसंतराव नाईक यांच्या अथक प्रयत्नांनी तांड्यांना स्थिर जीवन मिळाले. तांडा हा बंजारा समाजाचा दर्पण मानला जातो. तांडा सक्षमीकरणासाठी आणि तांडा व्यवस्था वैश्विक व्हावी म्हणून प्रख्यात विचारवंत एकनाथ नायक यांनी 'तांडेसामू चालो' या तांडावादी विचारांची रुजवणूक केली. बंजारा समाजात तांडा व्यवस्थेला अनन्यसाधारण महत्व आहे. तांडा द्वारे संस्कृती, भाषा, साहित्य जपण्याचे मौल्यवान कार्य चालू असते.

बंजारा समाज हा पूर्वीपासूनच वनांच्या सानिध्यात डोंगरदऱ्यात, माळरानांवर तांडा वस्ती करून स्थिरावलेला असल्याने सुपीक जमिनींचा मालक दिसून येत नाही. तांड्यांभोवती असेल तशी जमीन बंजारा समाजाने कसायला सुरुवात केली, तेथे उदरनिर्वाह भागवण्यापुरतेही शेतमालाचे उत्पादन होत नसल्याने बंजारा समाजाची आर्थिक परिस्थिती म्हणावी तशी सुधारलेली दिसून आली नाही. परिणामी हा मुळातच काबाडकष्ट करून उदरनिर्वाह करणारा समाज जेथे रोजंदारीने अथवा गुत्तेदारीने काम मिळेल, तेथे काम करण्यासाठी जाऊ लागला. कामाच्या एकूण कालावधीनुसार तेथे तो तात्पुरती वस्ती (कोप) करून राहत असतो. बंजारा कुटुंब त्या कालावधीत मूळ तांडा वस्तीवरून स्थलांतरित असते.

प्राथमिक शिक्षणाचे खऱ्या अर्थाने सार्वत्रिकीकरण होण्यासाठी मूल शाळेत नियमित आले पाहिजे, ते शाळेत टिकले पाहिजे. बंजारा समाजातील बहुसंख्य पालक दारिद्र्य

रेषेखालील म्हणून कुटुंबाचे उत्पन्न उदरनिर्वाह भागवण्यापुरतेही नसल्याने, सदरील कुटुंबे विविध रोजंदारी कामांच्या हंगामात तांड्यावरून दूर अंतरापर्यंत स्थलांतरीत होत असतात तेही वर्षातून चार - सहा महिने! म्हणजे मूल मूळ शाळेत अर्धे शैक्षणिक वर्ष सुद्धा व्यवस्थित पूर्ण करत नाही.

प्रस्तुत संशोधनात बंजारा समाजातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या हंगामी स्थलांतरामुळे त्यांच्या पाल्यांच्या प्राथमिक शिक्षणावर कसा परिणाम होतो, स्थलांतरीत कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शिक्षणात सातत्य राहावे यासाठी काही शासनामार्फत, सामाजिक सेवाभावी संस्था मार्फत काही उपाययोजना करण्यात येतात काय, त्यांचे फलस्वरुप प्राप्ती कशाप्रकारे होते आहे, त्यासंबंधित सदरील कुटुंबांच्या पाल्यांची प्राथमिक शिक्षणाची इतंभुत सद्यःस्थिती अभ्यासली जाणार आहे. शिक्षण कायद्याची उद्दिष्टे फलद्रुप होण्याच्या दृष्टीने तेथे योग्य दिशेने सुरु असलेले प्रयत्न, त्यातून होणारी परिणामकारक उपलब्धता, येणाऱ्या अडचणी कोणकोणत्या आहेत त्यावर काही उपाययोजना करता येऊ शकतात का याचा अभ्यास योग्य पद्धतीने करण्यात येणार आहे. एकूणच परिस्थितीवर बंजारा पालकांची, तेथील कार्यरत प्राथमिक शिक्षकांची मतेही पाहिली जातील. संदर्भासाठी नांदेड जिल्ह्यातील बंजारा तांडा वस्तींवरील प्राथमिक शाळांतील शिक्षक, विद्यार्थी, तत्संबंधी प्रशासकीय पर्यवेक्षकीय केंद्र प्रमुख, अधिकारी आणि स्थानिक शाळा व्यवस्थापन समिती इ. बाबतीत संबंधीत सर्व घटकांचा तेथील शैक्षणिक विकासाबाबतीत आढावा घेण्यात येणार आहे. बंजारा वस्तीवरील शाळा व्यवस्थापन संदर्भात जबाबदार घटकांची भूमिका, एकूण अध्ययन-अध्यापन प्रक्रिया यात काही अपूर्णता किंवा उदरनिर्वाह खर्च भागवण्यासाठी होणारे स्थलांतर इ. समस्यांबाबतीत काही उपाययोजना कशा केल्या जाऊ शकतील याचा संशोधनात्मक आढावा याद्वारे घेण्यात येणार आहे. संशोधन निष्कर्षाप्रत पोहोचून आवश्यक त्या शिफारशी केल्या जाणार आहेत.

२. संशोधनाची गरज :-

गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षण देण्याच्या दृष्टीने शिक्षण विभागामार्फत विविध योजना राबविल्या जातात तरीही बंजारा वस्तीवरील दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील बहुसंख्य मुले गुणवत्तेत समाधानकारक पातळी गाठताना दिसुन येत नाहीत. रस्तेमार्ग असुविधा, पिण्याच्या पाण्याची मुबलकता नसणे करीता बराचसा वेळ

पाण्यासाठी भटकंतीत वापरणे, दुर्गम भाग, यांबरोबरच रोजगार वस्तीजवळ उपलब्ध न होणे आणि म्हणूनच पाल्यांसह कुटुंबे दीर्घ कालावधी पर्यंत स्थलांतरीत होणे, इ. कारणांनी तेथील शैक्षणिक स्थिती मागासलेली दिसून येते. त्याला 'असर' अहवालासारखे पुरावे, विविध शैक्षणिक सर्वे इ. दुजोरा देत असतात. अनेकवेळा शाळा बंद स्थितीत असल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारीत होताना दिसतात याची कारणे शिक्षकांची रिक्त पदे तर कधी पर्यवेक्षकीय यंत्रणेची अनास्था अशी सांगितली जातात. तर कधी बंजारा वस्तीवरील दारिद्रय रेषेखालील पालकांच्या आर्थिक स्थितीमुळे मुलांच्या प्राथमिक शिक्षणावर गंभीर परिणाम होत असल्याचे समोर येत असते. एकंदरीत परिस्थितीचा अभ्यास करून याविषयी सद्यःस्थितीचे सविस्तर अवलोकन प्रत्यक्षरीत्या होणे आवश्यक आहे. त्यातून आवश्यक त्या उपाययोजनांचा शोध घेणे महत्त्वाचे तसेच गरजेचेही आहे.

३. संशोधनाचे महत्त्व :-

* बंजारा समाज वस्तींवर प्राथमिक शिक्षण दर्जेदारपणे पुरविण्यासाठी झालेले शासन स्तरावरून प्रयत्न आणि सद्या सुरू असलेले शैक्षणिक विकास कार्यक्रम यांची ओळख करून घेणे महत्त्वाचे आहे.

* बंजारा समाजातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची आर्थिक स्थिती नाजूक असण्याच्या कारणांचा सविस्तर आढावा घेणे आवश्यक आहे.

* बंजारा समाजातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील बालके इतर बालकांच्या शैक्षणिक गुणवत्ता बाबतीत समान पातळीवर असावेत यासाठी कोणते प्रयत्न सुरू आहेत त्याची माहिती मिळवणे महत्त्वाचे ठरेल.

* बंजारा समाजातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबे बहुसंख्य प्रमाणात दीर्घ कालावधी पर्यंत स्थलांतरीत असताना दिसतात, याची नेमकी कारणे शोधून काही उपाययोजना आजपावेतो केल्या गेल्या असतील त्यांची परिणामकारकता तपासणे महत्त्वाचे ठरते.

* बंजारा समाजाच्या दारिद्रय रेषेखालील पालकांसोबत प्राथमिक शिक्षण सुरू असलेल्या मुलांनाही स्थलांतरीत व्हावे लागते. त्यामुळे मुलांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासावर कसा परिणाम होतो हे या संशोधनाद्वारे सविस्तर विश्लेषणात्मक दर्शवण्यात येणार आहे.

* बंजारा समाजातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या आर्थिक स्थितीमुळे पालक हंगामी स्थलांतर करतात त्यामुळे पाल्यांच्या शैक्षणिक विकासात निर्माण होणाऱ्या अडथळयांचा अभ्यास करून प्रभावी उपायांचा शोध घेणे आवश्यक आहे. जेणेकरून ही बालके इतर विद्यार्थ्यांची बरोबरी या स्पर्धात्मक युगात करू शकतील.

उपरोक्त मुद्द्यांना अनुसरून प्रस्तुत संशोधनाला महत्त्व प्राप्त होणार आहे.

**** यापूर्वीचे संशोधन :-** सदरील विषयानुषंगाने झालेली संशोधने आणि निष्कर्ष अहवाल इ. चा आढावा घेतला जाणार आहे.

**** वैयक्तीक अनुभव :-** संशोधक स्वतः जिल्हा परिषद नांदेड च्या शाळेत प्राथमिक शिक्षक असून, बंजारा वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत असल्याचा अनुभव पाठीशी आहे.

४. संशोधनाचे समस्या विधान :-

'दारिद्र्य रेषेखालील बंजारा कुटुंबांच्या हंगामी स्थलांतरामुळे त्यांच्या पाल्यांच्या प्राथमिक शिक्षणावर होणारा परिणाम - एक अभ्यास'

५. समस्या विधानातील शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या :-

*** दारिद्र्य रेषेखालील कुटुंब :-** शासनाने ठरविलेल्या आर्थिक निकषानुसार जी कुटुंबे दारिद्र्य रेषेपेक्षा कमी खर्च करतात, त्यांना 'दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे' (Below Poverty Line; BPL) असे संबोधले जाते.

*** बंजारा कुटुंब :-** महाराष्ट्र राज्यात विमुक्त जाती- अ (अनु. क्र.७ बंजारा, ७ अ ते स) अंतर्गत नोंद असलेल्या बंजारा, लमानी समाजातील कुटुंब.

*** हंगामी स्थलांतर :-** विविध शेती वा उद्योगधंदे बाबतची कामे करण्याचा कालावधीत उदा. ऊसतोड हंगाम. इ. मजुरी कामानिमित्त स्वतःची वस्ती सोडून कुटुंबाने केलेले स्थलांतर.

*** पाल्य :-** दारिद्रय रेषेखालील बंजारा कुटुंबातील प्राथमिक शिक्षण घेत असलेली बालके (मुले, मुली).

*** प्राथमिक शिक्षण :-** इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंतचे शिक्षण.

‘दारिद्रय रेषेखालील हंगामी स्थलांतरीत होणाऱ्या बंजारा कुटुंबांच्या बालकांच्या प्राथमिक शिक्षणात सहभागी घटक:-

**** संकल्पनात्मक विश्लेषण ** -**

महाराष्ट्र राज्य ग्रामविकास व पंचायत राज विभाग

↓

शिक्षणाधिकारी प्राथमिक (जिल्हा परिषद)

↓

गटशिक्षणाधिकारी (पंचायत समिती, शिक्षण विभाग)

↓

विस्तार अधिकारी शिक्षण

↓

केंद्र प्रमुख (केंद्रीय प्राथमिक शाळा)

↓

मुख्याध्यापक (प्राथमिक शाळा)

↓

प्राथमिक शिक्षक (इ. पहिली ते पाचवी वर्ग अध्यापन करणारे शिक्षक)

↓

दारिद्रय रेषेखालील बंजारा कुटुंबातील हंगामी स्थलांतर करणारे पालक व त्यांची प्राथमिक शिक्षण घेत असलेली मुले – मुली

६. संशोधनाची उद्दिष्टे :-

१. दारिद्रय रेषेखालील बंजारा कुटुंबांच्या पाल्यांच्या प्राथमिक शिक्षणाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

२. दारिद्रय रेषेखालील बंजारा कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीचा त्यांच्या पाल्यांच्या प्राथमिक शिक्षण प्रक्रियेवर होणारा परिणाम अभ्यासणे.

३. दारिद्रय रेषेखालील हंगामी स्थलांतरित होणाऱ्या बंजारा कुटुंबांच्या पाल्यांची प्राथमिक शिक्षणाची गरज पूर्ण होण्याच्या दृष्टीने उपलब्ध शैक्षणिक सुविधांचा अभ्यास करणे.

४. बंजारा तांडा वस्तींवरील बालकांचे प्राथमिक शिक्षण दर्जेदारपणे होण्यासाठी उपलब्ध शासकीय धोरणांचा व योजनांचा सविस्तर अभ्यास करणे.

५. दारिद्रय रेषेखालील बंजारा कुटुंबातील पालकांसोबत स्थलांतर करणाऱ्या बालकांच्या प्राथमिक शिक्षणात सहभागी प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, पालक यांची मते जाणून घेणे.

६. दारिद्रय रेषेखालील बंजारा कुटुंबातील विद्यार्थ्यांना विद्यार्थी कल्याण योजनांचा उपयोग व परिणाम अभ्यासणे.

७. दारिद्रय रेषेखालील बंजारा कुटुंबांतील विद्यार्थ्यांना हंगामी स्थलांतराचे प्राथमिक शिक्षण प्रक्रियेत सद्यस्थितीत होणारे परिणाम व त्यावरील उपाययोजनांचा शोध घेणे.

७. संशोधनाची गृहितके :-

१. महाराष्ट्र राज्यात शिक्षण विभागामार्फत गाव तेथे शाळा, वस्ती तेथे प्राथमिक शाळा पुरविण्यात आल्या आहेत.

२. ६ ते१४ वयोगटातील २० विद्यार्थी संख्या असलेल्या वस्तीवर, एक किलोमीटरच्या आत प्राथमिक शिक्षणासाठी प्राथमिक शाळा उपलब्ध करून दिलेली आहे.

४. प्रत्येक वस्तीवरील शाळांना वेतन वा मानधन देऊन प्राथमिक शिक्षक नेमणूक केलेली आहे.

५. शाळा या संकल्पनेनुसार सर्व सुविधायुक्त प्राथमिक शाळा बंजारा वस्तीवरही उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

६. बंजारा समाजातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना आर्थिक परिस्थितीमुळे शेतीकाम अथवा उद्योगधंदे कामाच्या हंगामात मूळ वस्तीवरून स्थलांतर करावे लागते त्याचा परिणाम म्हणून पाल्यांच्या प्राथमिक शिक्षण विकासात अडथळे निर्माण होत असावेत.

८. संशोधनाची परिकल्पना :-

१. प्राथमिक शिक्षण दर्जेदारपणे मिळण्याच्या दृष्टीने बंजारा वस्तीवरील शाळा सुसज्ज असाव्यात.

२. राज्याच्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्यानुसार बंजारा वस्तीवरील शैक्षणिक गुणवत्ता विकास होण्यासाठी काटेकोर अंमलबजावणी सुरू असेल.

३. बंजारा वस्तीवरील प्राथमिक शाळांमधून विद्यार्थी कल्याण बाबतीत शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत असते.

४. बंजारा समाजातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या विद्यार्थ्यांना हंगामी स्थलांतराची समस्या ही प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यातील मोठी अडचण ठरत असावी.

५. बंजारा पालकांचे हंगामी स्थलांतर टाळण्यासाठी शासनाचे काही उपाययोजनात्मक प्रयत्न सुरू आहेत. स्थानिक रोजगानिर्मिती इ. प्रयत्न शासनाने सुरू केलेले आहेत.

६. बंजारा समाजातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या हंगामी स्थलांतर कालावधीत विद्यार्थ्यांचे प्राथमिक शिक्षण सातत्याने सुरू राहण्यासाठी शासनस्तरावरून उपाययोजना करण्यात येत असतात.

७. बंजारा पालकांनी पाल्यांसह स्थलांतर करू नये, म्हणून त्यावर उपायमार्ग बाबतीत पालकांचे समुपदेशन केले जाते. हंगामी वसतिगृह सारख्या सुविधांचा लाभ दिला जातो.

९. संशोधनाची व्याप्ती :-

क्षेत्र व्याप्ती :-

संशोधन विषयानुषंगाने बंजारा वस्तीवरील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या बालकांच्या प्राथमिक शिक्षणाची सद्यःस्थिती अभ्यासण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील बंजारा वस्तीवर असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अथवा खाजगी संस्थांच्या प्राथमिक शाळा, शैक्षणिक योजना, तेथील शिक्षक, सुलभक, आणि दारिद्रय रेषेखालील कुटुंबांतील पालक व विद्यार्थी असे क्षेत्र निवडलेले आहे.

आशय व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनात बंजारा समाजातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या हंगामी स्थलांतरामुळे त्यांच्या पाल्यांच्या प्राथमिक शिक्षणावर होणारा परिणाम अभ्यासणे असा महत्त्वाचा आशय असणार आहे.

घटक व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन कार्यात नांदेड जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील बंजारा कुटुंबे, वस्तीवरील प्राथमिक शाळा, शिक्षक व दारिद्रय रेषेखालील पालक आणि त्यांचे प्राथमिक शिक्षण घेत असलेले पाल्य, शाळा व्यवस्थापनात सहभागी शासकीय व स्थानिक घटक असणार आहेत.

१०. संशोधनाची मर्यादा :-

क्षेत्र मर्यादा :- नांदेड जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील बंजारा कुटुंबांतील प्राथमिक शिक्षण घेत असलेले विदयार्थी, पालक, तेथील प्राथमिक शाळा, शिक्षक, उपलब्ध शैक्षणिक सुविधा असे मर्यादित क्षेत्र असणार आहे.

आशय मर्यादा :- नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या हंगामी स्थलांतरामुळे त्यांच्या पाल्यांच्या प्राथमिक शिक्षणावर होणारा परिणाम अभ्यासणे यापूरता आशय मर्यादित असणार आहे.

घटक मर्यादा :- नांदेड जिल्ह्यातील बंजारा दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे, वस्तीवरील प्राथमिक शाळा, शिक्षक व दारिद्र्य रेषेखालील पालक, विदयार्थी, शाळा व्यवस्थापन संबंधीत समिती व इतर शैक्षणिक असे मर्यादित घटक असणार आहेत.

कालावधी मर्यादा :- प्रस्तुत संशोधन कार्यासाठी मागील १० वर्षे कालावधीचा आढावा घेतला जाणार असून प्रस्तुत संशोधन कार्य विद्यापीठामार्फत वेळोवेळी ठरवून दिलेल्या आदेशांन्वये विहीत कालावधीत पूर्ण केले जाणार आहे.

११. संशोधन कार्यपद्धती :-

सदरील संशोधन कार्यासाठी निरीक्षण, सर्वेक्षण, मुलाखती, मतावली इ. पद्धतींचा अवलंब करण्यात येईल.

१२. संशोधनाची साधने व तंत्रे :-

प्रस्तुत संशोधन कार्यात खालीलप्रमाणे साधनतंत्रे वापरण्यात येणार आहेत.

१. प्रश्नावली

२. मुलाखती

३. निरीक्षण तंत्रे

४. मतावली

५. निरीक्षण तक्ते

१३. संशोधन जनसंख्या :-

प्रस्तुत संशोधनासाठी जिल्हा नांदेड अंतर्गत दारिद्रय रेषेखालील बंजारा कुटुंबांचे पाल्यांसह हंगामी स्थलांतराचा प्राथमिक शिक्षणावर परिणाम या बाबतीत संबंधीत शासकीय व स्थानिक घटक तेथील शाळा, शिक्षक आणि दारिद्रय रेषेखालील पालक, विदयार्थी अशी जनसंख्या आहे.

१४. संशोधन नमुना निवड पद्धती :-

प्रस्तुत संशोधन कार्यात सर्वेक्षण, मतावली, मुलाखतीकरिता संशोधन जनसंख्या लक्षात घेऊन सहेतुक नमुना निवड पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

१५. संशोधनाची सांख्यिकीय परिमाणे :-

सदरील संशोधनात संकलित माहितीवरून विश्लेषण व अर्थनिर्वचन केले जाईल. निष्कर्षाप्रत जाण्यासाठी वारंवारिता सारणी, शेकडेवारी, सहसंबंध, सहसंबंध गुणक, आलेख, इ. चा वापर करण्यात येईल.

संशोधन साधन तंत्रांची विश्वसनीयता व सप्रमाणता :-

साधने म्हणून वापरण्यात येणारी प्रश्नावली, मतावली, मुलाखतीचे प्रश्न, शिष्टाचार बाबतीतील सूचना इ. तज्ज्ञ मार्गदर्शक मार्फत प्रमाणित करून घेण्यात येतील. परिकल्पनेत मांडण्यात आलेला आशावाद फलद्रूप होणेस्तव सर्वेक्षण साधनांची विश्वसनीयता तज्ज्ञ मार्गदर्शक यांच्या कडून प्रमाणित करून घेतलेली असणार आहे.

१६. संशोधनाचे प्रकरणीकरण :-

प्रस्तुत संशोधन अहवाल लेखनातील त्यांचा क्रम, प्रकरणांची नावे, प्रत्येक प्रकरणांतील मुद्दे, उपमुद्दे इ. सर्व माहिती अहवालामध्ये नमूद असेल.

प्रकरण पहिले :- प्रास्ताविक - प्रस्तुत संशोधन विषयानुसार प्रस्तावना लिहून मार्गदर्शक यांच्या कडून तपासून घेऊन त्यास अंतिम स्वरूप देण्यात येईल.

प्रकरण दुसरे :- पूर्व संशोधने व संबंधीत साहित्याचा आढावा - सदरील संशोधनाकरीता विषयाच्या अनुषंगाने झालेली यापूर्वीची संशोधने व विविध संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात येईल. संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वृत्तपत्रे, शैक्षणिक नियतकालिके, विविध शैक्षणिक निर्णय, पत्रके, शासन निर्णय, नियमावली, धोरणे इ. चा संभाव्य आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे :- संशोधन पद्धती - प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन संशोधन पद्धतीच्या पायऱ्या, जनसंख्या निवड, सामग्री संग्रहाची साधने विकसन, साधनांची विश्वसनीयता व सप्रमाणता, पथदर्शक अभ्यास, माहिती संकलन इ. मुद्दे समाविष्ट करण्यात येतील. त्यानुषंगाने संशोधनाची कार्यवाही करण्यात येईल.

प्रकरण चौथे :- माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन - प्रस्तुत संशोधन कार्यात माहिती संकलन केल्याबाबत थोडक्यात वर्णन, माहितीचे विश्लेषण करण्यासाठी वापरलेल्या प्रगत सांख्यिकी तंत्राच्या निवडीचे सकारण स्पष्टीकरण देऊन माहितीचे अर्थनिर्वचन व निष्कर्ष देण्यात येतील.

प्रकरण पाचवे :- निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय - प्रस्तुत संशोधनातील विषयानुषंगाने दारिद्रय रेषेखालील बंजारा कुटुंबांच्या हंगामी स्थलांतरामुळे त्यांच्या पाल्यांच्या प्राथमिक शिक्षणावर होणारे परिणाम विषयक मुद्द्यांविषयी योग्य शिफारशी करून पुढील संशोधनासाठी विषय मांडणी करण्यात येईल.

प्रकरण सहावे :- संशोधनाचा सारांश- शेवटी प्रस्तुत संशोधनाचा सारांश थोडक्यात मांडण्यात येईल व संशोधन कार्य पूर्ण करण्यात येईल.

प्रकरण सातवे :- अहवाल सादरीकरण - अहवाल लेखन कार्य तज्ज्ञ मार्गदर्शक मार्फत तपासून, व्यवस्थित बांधणी करून, अहवाल सादरीकरण करण्यात येईल.

१७. संशोधन कार्यवाहीचे टप्पे :-

समस्या निश्चिती

संशोधन आराखडा लेखन

आराखडा सादरीकरण

आराखडा अंतिम मंजुरी

पूर्व संशोधने व संशोधनासंबंधीत साहित्याचा आढावा

संशोधन पद्धतींचा आढावा

संशोधन साधन निर्मिती

माहिती संकलन

माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

निष्कर्ष व शिफारशी

प्रत्यक्ष कार्यवाही

संशोधन अहवाल लेखन

अहवाल तपासणी व अंतिम मंजुरी

अहवाल छपाई

अहवालाचे संपादन

अहवालास अंतिम रूप देणे

अहवालाची बांधणी

अहवाल सादरीकरण

१८. वेळापत्रक :- प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पुढीलप्रमाणे वेळापत्रक वापरण्यात येईल.

१. संशोधन आराखडा सादरीकरण.	मार्च २०२३
२. विषयासंबंधी सखोल वाचन.	एप्रिल - मे २०२३
३. संशोधन साधन निर्मिती व अभ्यास.	जून २०२३
४. प्रत्यक्ष कार्यवाही.	जुलै २०२३ ते जाने. २०२५
५. सांख्यिकीय प्रक्रिया, अर्थनिर्वचन निष्कर्ष व शिफारशी सुचविणे.	फेब्रु. २०२५ ते एप्रिल २०२५
६. अहवाल लेखन व छपाई.	मे २०२५
७. अहवाल बांधणी.	मे २०२५
८. अहवाल सादरीकरण.	मे- जून २०२५

१९. अंदाजपत्रक :-

अनु. क्र.	खर्चाचा तपशील	अंदाजे खर्च
१.	संशोधन आराखडा सादर करणे	२०००
२.	संदर्भ ग्रंथ इ. साहित्य खरेदी	५०००
३.	संशोधन साधन निर्मिती	१०,०००
४.	प्रत्यक्ष संशोधन कार्यवाही	१०००
५.	संशोधन प्रवास खर्च	१०,०००
६.	अहवाल छपाई, झेरॉक्स इ.	१०,०००
७.	अहवाल बांधणी	३०००
	एकूण	४१,०००

२०. संदर्भ ग्रंथ, साहित्य सूची :-

१. संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, आगलावे प्रदीप २०००. विद्या प्रकाशन नागपूर.

२. ऊसतोडणी मजुरांचं स्थलांतरित जगणं, कॉ.कुमार शिराळकर, मुक्ता कुलकर्णी, विवेक घोटाळे, सोमिनाथ घोळवे, द युनिक फाउंडेशन.

३. शैक्षणिक संख्याशास्त्र, कदम चा. प. २००५. नूतन प्रकाशन पुणे.

४. शैक्षणिक संशोधन पद्धती, भिंताडे वी. रा. २००६. नूतन प्रकाशन पुणे.

५. शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, मुळे रा. शा., उमाटे वि. तु. १९९८. विद्या प्रकाशन छ. संभाजीनगर.

६. स्त्री-उसतोड कामगार, कालिदास भांगे, चिन्मय प्रकाशन.

७. संशोधन विषय संबंधीत शासकीय कायदा, धोरणे, शासन निर्णय, परिपत्रके, शैक्षणिक योजना बाबतीत अधिकृत प्रसिद्धी पत्रके, अहवाल इ.

* संशोधक *	* मार्गदर्शक *
धोंडगे माधव पांडुरंग	डॉ. माने मारुती शिवराम